अनुसूचित जमाती प्रवर्गातून नियुक्ती झालेल्या तथापि, जात वैधता पडताळणी प्रमाणपत्र सादर करु न शकलेल्या महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय आस्थापनेवरील अधिकारी/ कर्मचाऱ्यांकरिता अधिसंख्य पद निर्माण करण्याबाबत....

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,**
विधान भवन, मुंबई.
**क्रमांक :** १६२६१ /क-१,
**दिनांक :** २४ नोव्हेंबर, २०२०

**संदर्भ :-** १) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.बीसीसी-२०१८/प्र.क्र.३०८/१६-ब, दि.२१ डिसेंबर, २०१९
२) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.बीसीसी २०२०/प्र.क्र.१८७अे/१६-ब, दि. ३० जून, २०२०.

**:: ज्ञापन ::**

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.बीसीसी-२०१८/प्र.क्र.३०८/१६-ब, दिनांक २१.१२.२०१९ अन्वये मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपिल क्र.८९२८/२०१५ (चेअरमन ॲन्ड मॅनेजिंग डायरेक्टर, एफसीआय आणि इतर विरुध्द जगदीश बालाराम बहिरा व इतर) व इतर याचिका यामध्ये दिनांक ६ जुलै, २०१७ रोजी मागास जातींना असलेल्या आरक्षणाच्या आधारे शासकीय सेवेत दाखल झालेल्या व त्यानंतर जातीचे दावे अवैध ठरलेल्या व्यक्तींना शासकीय सेवेत संरक्षण देय ठरत नाही, या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी व मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर यांनी रिट याचिका क्र.३१४०/२०१८ मध्ये दिनांक २८.९.२०१८ च्या आदेशान्वये मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार दिनांक ३१.१२.२०१९ पर्यंत कार्यवाही करण्याचे आदेश दिले असल्याने अशा अधिकारी/कर्मचारी यांची अधिसंख्य पदे निर्माण करुन या अधिसंख्य पदांवर अधिकारी/कर्मचारी यांना वर्ग करण्याची कार्यवाही

..२/-

करण्याची सूचना दिली आहे. शासन निर्णयातील सूचनेनुसार या सचिवालयातील सहायक कक्ष अधिकारी, अनुवादक आणि लिपिक-टंकलेखक संवर्गातील अधिसंख्य पदावर नियुक्ती करण्याबाबत आवश्यक कार्यवाही स्वतंत्रपणे करण्यात आलेली आहे.

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.बीसीसी २०२०/प्र.क्र.१८७ ओ/१६-ब, दिनांक ३०.०६.२०२० अन्वये मा.सर्वोच्च न्यायालयाचे सिव्हिल अपिल क्र.८९२८/२०१५ व इतर याचिका यामध्ये दिनांक ६.७.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाची व मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर यांनी रिट याचिका क्र.३१४०/२०१८ मध्ये दिनांक २८.९.२०१८ च्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरीता "अधिसंख्य पदे" निर्माण करण्याचे अधिकार प्रशासकीय विभागांना प्रदान केले आहेत.

त्यानुसार महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या आस्थापनेवर अनुसूचित जमाती जात वैधता पडताळणी प्रमाणपत्र सादर न केलेल्या व सद्य:स्थितीत कार्यरत असणाऱ्या खालील तक्त्यात नमूद अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या गट-ब (राजपत्रित/अराजपत्रित) सेवा अधिसंख्य पदावर वर्ग केल्याच्या दिनांकापासून तात्पुरत्या स्वरुपात ११ महिने किंवा त्यांचा सेवानिवृत्तीचा दिनांक यापैकी जे अगोदर घडेल त्या दिनांकापर्यंत ४ अधिसंख्य पदे या ज्ञापनान्वये निर्माण करण्यात येत आहेत :-

| अ.क | अधिकारी/कर्मचाऱ्यांचे नाव व पदनाम | नियुक्तीचा दिनांक | अधिसंख्य पदावर सेवा वर्ग करण्यात आल्याचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|
| १) | श्री.चं.कुं.नंदनवार, कक्ष अधिकारी | ०९.०२.१९९६ | १८.०३.२०२० | अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही. |
| २) | श्री.द.न.ब्यागलवार, सहायक कक्ष अधिकारी | १०.०९.२०१४ | ३१.०८.२०२० | अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही. |
| ३) | श्री.वै.सि.नागपुरे, सहायक कक्ष अधिकारी (तात्पुरत्या स्वरुपात) | १९.११.१९९८ | ३१.०८.२०२० | अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही. |
| ४) | श्री.सं.रा.कोळी, अनुवादक | २६.०९.२००५ | १६.१०.२०२० | अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही. |

..३/-

सदर अधिसंख्य पदांच्या वेतनावर येणारा खर्च **"मागणी क्रमांक झेडसी-१, २०११, संसद/राज्य/संघराज्य क्षेत्र विधानमंडळे, ०२ राज्य/संघराज्य क्षेत्र विधानमंडळे, १०३-विधानमंडळ सचिवालय, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (अनिवार्य) (२०११ ००७६) ०१-वेतन"** हा या लेखाशीर्षाखाली खर्ची दर्शविण्यात यावा व त्याच लेखाशीर्षातून भागविण्यात यावा.

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.बीसीसी-२०१८/प्र.क्र.३०८/१६-ब, दिनांक २१.१२.२०१९ मधील तरतुदीनुसार व सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.बीसीसी २०२०/प्र.क्र.१८७अे/१६-ब, दि. ३०/६/२०२० अन्वये प्रदान करण्यात आलेल्या प्राधिकारान्वये मा.सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांच्या मान्यतेने सदरहू ज्ञापन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(ऋतुराज ज. कुडतरकर)**
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**प्रति,**

उपरोक्त सर्व संबंधित अधिकारी/कर्मचारी

**प्रतिलिपी :-**

१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव.
२) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
३) मा.विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानपरिषद/विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
४) मा.सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
५) अधिदान व लेखाधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई
६) कक्ष अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
७) संगणक (क-२) कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (संकेतस्थळावर अपलोड करण्याकरिता).
८) वैयक्तिक नस्ती.
९) निवडनस्ती.